ललिता गंडभीर
4200 NorthOcean Dr.
#1501-2
Riviera Beach, FL 33404
USA
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# तक्रारी

मी कुठल्याही कंपनीला फोन करते तेव्हा

मधूर आवाजात ध्वनीफीत मला सतत

"मेन्यू हॅज चेंजड्." असं नेमकं कसं सांगते

आणि मी कितीही एक्स्टेंशन्स् दाबली,

सर्व एक्सटेंशन्स्च्या शाब्दिक जाळ्यातून फिरले

तरी मला माझ्या प्रश्नाचं उत्तर का मिळत नाही?

व जितंजागतं माणूस फोनवर कसं भेटत नाही?

चुकूनमाकून कधी कुणी फोनवर भेटलंच तर

तो किंवा ती "रॉंग एक्सटेंशन, लेट मी कनेक्ट यू"

असं म्हणून शाब्दिक छळचक्राच्या रेकॉर्डिंगमधे परत का आाणून सोडते?

यदाकदाचित बरोबर एक्सटेंशन मिळालं

तर ते ऐन वेळी डिसकनेक्ट का होतं?